MHST110000262019

**नियमीत दिवाणी दावा क्र. ११/२०१९**

**नथु उर्फ नाथाजी शेटे : वादी**

**वि.**

**शकुंतला पडवळ वै. : प्रतिवादी**

## निशाणी क्र. ७३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ०८–महादेव सावळा शेटे याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशीर माफ (delay condone) होवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांचे कथन की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ०८– महादेव सावळा शेटे हे दि. ११.०१.२०२४ रोजी कण्हेर, ता. जि. सातारा येथे मयत झालेले आहेत. त्यांना अर्जात नमुद केल्याप्रमाणे कायदेशीर वारस आहेत. वादी यांना प्रतिवादी क्र. ८ मयत झाल्याची माहिती उशीरा समजली. वादी यांना जाणुनबुजुन मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास उशीर झाला नाही किंवा निष्काळजीपणा झालेला नाही. वादी यांना प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेण्यास ७ महिने ०३ दिवसाचा उशीर झाला आहे.

०३. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ८ चे वारस अभिलेखावर घेतले नाहीत तर, वादीचा दावा हा तांत्रीक कारणावरुन निष्फळ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, वादीचे न्याय हक्कावर गदा येणार आहे व वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र. ०८ चे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे, वादी यांनी प्रतिवादी क्र.०८–महादेव यांचे वारस अभिलेखावर घेण्यास जो विलंब झाला आहे तो माफ होवुन मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०४. प्रतिवादी क्र. १, ७,८,९,११ व १२ यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे देवुन अर्ज मंजुर करणेस तीव्र आक्षेप नोंदवला आहे. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी ०७ महिने उशीराने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. वादी यांनी उशीराबाबतचे संयुक्तिक कारण अर्जात दिलेले नाही. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज फेटाळण्यात यावा व अर्ज मंजुर केल्यास वादी यांच्यावर जास्तीत जास्त वादखर्च (cost) लादणेत यावा.

०५. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०६. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतींचे वाटप व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. कागद यादी निशाणी क्र. ७२ लगत अ.क्र.०१ कडे दाखल असलेल्या मृत्यु प्रमाणपत्राचे बारकाईने अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. ०८–महादेव सावळाराम शिंदे हे दिनांक ११.०१.२०२४ रोजी मौजे कण्हेर येथे मयत झाले आहेत. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दि. १४.११.२०२४ रोजी दाखल केला आहे. वास्तविक पाहता वादी यांनी प्रतिवादी क्र.०८–महादेव मयत झाल्यानंतर ९० दिवसाच्या आत वारस अभिलेखावर घेणे जरुरीचे होते. परंतु, वादी यांना मयत प्रतिवादी क्र. ०८–महादेव यांच्या वारसांचे अभिलेखावर घेणेस जवळजवळ ०७ महिने ०४ दिवसाचा विलंब झाल्याचे दिसुन येते. वादी यांनी त्यांच्या अर्जात प्रतिवादी क्र.०८–महादेव हे मयत झाल्याचे त्यांना उशीरा समजल्याने त्यांना वेळेत मयत महादेव यांचा मृत्युचा दाखला व वारसांची नाव व पत्ते घेण्यास उशीर झाल्याने सदरचा विलंब झाला आहे असे कारण दिले आहे. परंतु, वादी यांनी विलंबाचे दिलेले कारण संयुक्तिक दिसुन येत नाही. कारण, मयत प्रतिवादी हा त्यांच्या भावकीतील आहे.

०७. प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे वाटप होण्यासाठी दाखल आहे. प्रस्तुत दावा हा शेत मिळकत म्हणजे स्थावर मिळकतीसंदर्भात असल्याने प्रतिवादी क्र. ०८– महादेव हे मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांना दावा मिळकतीत कायदेशीर हक्क प्राप्त होतात. त्यामुळे, मयत प्रतिवादी क्र. ०८–महादेव यांचे वारस न्यायाच्या

दृष्टीने अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. याऊलट दावा गुणदोषावर निकाली निघण्यास मदत होईल. सदर दाव्यात प्रतिवादी क्र.०८–महादेव यांचे वारस अभिलेखावर न घेतल्यास दाव्यात गुंतागुंत निर्माण होऊ शकते. तसेच प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केला तर वादी यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

वादी यांचा सदरचा नि.क्र.७३ वरील अर्ज मंजूर करणेत येतो.

VIKRAM AMBADAS AVHAD
Digitally signed by VIKRAM AMBADAS AVHAD
Date: 2026.07.07 17:43:34 +0530

**दिनांक** – ०७.०७.२०२६ (डॉ. विक्रम अं. आव्हाड)

**ठिकाण** – मेढा **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा**